वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील **विमल तलावाच्या** पर्यावरण संवर्धनासाठी महानगरपालिकेकडून राबवण्यात येणा-या प्रकल्पातील कामांच्या खर्चास **प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

## महाराष्ट्र शासन

**पर्यावरण विभाग, मंत्रालय,**

शासन निर्णय क्रमांक: रासयो-२०११/प्र.क्र.१४८/ता.क. ३

नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: २१ मार्च, २०१२.

वाचा:- १) वसई-विरार महानगरपालिकेचे पत्र क्र.व.वि.श.म.का अ/पा.फ./२०७/११ दि. ३०/१२/२०११
२) या विभागाचे पत्र क्र. रासयो२०११/प्र.क्र.१४८/तां.क.३ दि. ९/१/२०१२
३) वसई-विरार महानगरपालिकेचे पत्र.क्र.व.वि.श.म.काअ-बांध/१९७५/२०१२दि.१७/१/२०१२

**प्रस्तावना:-**

राज्यातील तलाव, सरोवरे व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने राज्य योजनेतंर्गत योजनेत राज्य सरोवर संवर्धन योजना सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून सुरू केली आहे. या योजनेतंर्गत सर्वसाधारणपणे खालील मुख्य कामांचा समावेश होतो.

१. तलावाच्या पाण्याचे प्रदूषण करणारे स्त्रोत निश्चित करून प्रदुषण रोखण्यासाठी उपाययोजना करणे.
२. तलावात साचलेला अनावश्यक घातक व ऑरगॅनीक गाळ काढणे.
३. तलावाची गुणवत्ता टिकविण्याकरीता, तलावाच्या पाणथळ क्षेत्राची धुप रोखण्यासाठी उपाययोजना करणे
४. तलावातील अनावश्यक व उपद्रवी वनंस्पती नष्ट करून त्यांची वाढ नियंत्रणात आणण्यासाठी उपायोजना करणे.
५. तलावांतर्गत जैविक प्रक्रीयेव्दारे तलावातील पाण्याची गुणवत्ता सुधारणे.
६. किनारा सौदर्यीकरण, हरीत पट्टा विकसीत करणे, कुंपण घालणे, मनोरंजनासाठी बालोद्यान, नौकाविहार, कमी किमतीची स्वच्छतागृहे इत्यादी.
७. जनसहभाग व जनजागृतीसाठी कार्यक्रम तसेच प्रदूषण रोखण्यासाठी स्थानिक परीस्थितीनुसार करावयाच्या उपाययोजना.

या योजनेतंर्गत सन २०११-१२ या आर्थिक वर्षात वसई-विरार महानगरपालिकेमार्फत सादर विमल तलावाचा प्रस्ताव मंजूर करण्याचे शासन विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

राज्य योजनेखाली राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत वसई-विरार महानगरपालिकेमार्फत सादर विमल तलावाच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धनासाठी सविस्तर प्रकल्प अहवालानूसार सोबत जोडलेल्या **"प्रपत्र - अ"** मध्ये नमूद केलेली कामे पूर्ण करण्यासाठी एकूण **रू. ७,०७,००,००० /- (अक्षरी रूपये सात कोटी सात लाख फक्त)** इतक्या रकमेस खालील अटी व सोबत जोडलेल्या **"प्रपत्र -ब"** मधील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ. लोकसहभाग व पर्यावरण जनजागृती या कार्यक्रमामध्ये " विमल तलाव परिसरातील शेतकऱ्यांमध्ये रासायनिक खते / कीटकनाशके यांच्याऐवजी सेंद्रिय खते / कीटकनाशके यांच्या वापराबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या " कार्यक्रमाचा समावेश करण्यात यावा.

ब. तलावासभोवताली Chain link fencing करताना, जैवविधतेच्या दृष्टीने फेन्सिंगच्या जमिनीकडील बाजूस १.५ फूट जागा मोकळी ठेवण्यात यावी. या जागेमधून तलावामध्ये कचरा जाऊ नये यासाठी छोट्या झुडूपांचा हरित पट्टा फेन्सिंगला लागून विकसित करावा.

क. Landscaping बाबत काम सुरू करण्यापूर्वी नियोजित कामाबाबतचा सविस्तर आराखडा विभागास सादर करावा. यामध्ये स्थानिक वृक्ष, झुडूपे यांच्या रोपणाचा, झाडांविषयी माहिती देणारे फलक लावणे इ. कामांचा समावेश करण्यात यावा

२. "प्रपत्र -अ" मधील नमूद कामांना प्रथमत: तांत्रिक मंजूरी प्राप्त करून घेण्यात यावी. योजनेच्या प्रत्येक टप्प्यात हाती घेण्यात येणा-या कामाचे मंजुर तांत्रिक आराखडे, अंदाजपत्रके, नकाशे, संकल्पचित्र इ. शासनाकडे काम सुरू करण्यापूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. शासनास उपरोक्त माहिती सादर केल्यानंतरच कामे सुरू करण्यात यावीत. हाती घेण्यात यावयाच्या ("प्रपत्र-अ" मधील नमूद कामे) कामांसंबंधित तलावाच्या सद्यस्थितीचे छायाचित्रे घेण्यात यावी, तसेच व्हीडीओ रेकॉर्डिंग करण्यात यावे. कामांच्या प्रगतीनुसार दर दोन महिन्यांनी याप्रकारे छायाचित्रण करण्यात यावे. योजनेतील कामे व त्यासाठीचा खर्च याबाबत मासिक आढावा घेऊन त्यानुसार बदल करण्याचे अधिकार शासनाकडे राहतील. सदर मंजुर एकुण रकमेपैकी ७०% हिस्सा म्हणून राज्य शासन व ३०% हिस्सा म्हणून वसई-विरार महानगरपालिका निधी उपलब्ध करून देईल. सदर योजनेची वित्तीय आकृतीबंध पुढील प्रमाणे राहील:-

| अ.क्र. | हिस्सा | मंजुर निधी | अक्षरी मंजुर निधी |
|---|---|---|---|
| १ | ७०% राज्य हिस्सा | रू. ४,९४,९०,०००.००/- | रूपये चार कोटी चौऱ्याण्णव लाख नव्वद हजार फक्त |
| २ | ३०% वसई-विरार महानगरपालिकेचा हिस्सा | रू.२,१२,१०,०००/- | रूपये दोन कोटी बारा लाख दहा हजार फक्त |
| | **एकूण** | **रू. ७,०७,००,०००/-** | **अक्षरी रूपये सात कोटी सात लाख फक्त** |

३. उपरोक्तचा अनुषंगाने होणारा खर्च मागणी क्र. यू-४, ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण -०४-पदुषण प्रतिबंध व नियंत्रण १०३ वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना (३४३५ ०१ ८२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

४. योजनेच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांची असेल.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www. maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०६२१०८१७११२२०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दे.क.मानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.

प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
जिल्हाधिकारी, ठाणे.
आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका, विरार
संचालक, नगरपालिका प्रशासन वरळी, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
मा. मंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-१६/ अर्थसंकल्प -७, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.

शासन निर्णय क्रमांक: रासयो-२०११/प्र.क्र.१४८/ता.क. ३, दि. २१ मार्च, २०१२ सोबतचे सहपत्र.

प्रपत्र - अ

| Conservation of Vimal Lake, Vasai | | |
|---|---|---|
| Sr. No. | Item | Amount (Rs.) |
| A | **Core components** | |
| 1 | De-silting & de-weeding | 2,00,00,000.00 |
| 2 | Construction of new ring bund along periphery | 1,50,00,000.00 |
| 3 | Sewerage collection system & sewage treatment plant (Phytorid technology plant) | 1,00,00,000.00 |
| 4 | Storm water collection system and silt traps | 1,00,00,000.00 |
| 5 | Overflow weir | 9,00,000.00 |
| 6 | Aeration system with wind mill | 22,00,000.00 |
| | **Sub Total** | |
| B | **Non- Core Component** | |
| 1 | Chain link fencing along periphery | 35,00,000.00 |
| 2 | Idol- immersion tank | 24,00,000.00 |
| 3 | Construction of dhobi ghat | 9,00,000.00 |
| 4 | Landscaping | 5,00,000.00 |
| | **Sub Total** | |
| C | Public awareness and sensitization | 1,00,000.00 |
| | | |
| | **Total** | **6,55,00,000.00** |
| | Centage charges | **52,00,000.00** |
| | **Grand total** | **7,07,00,000.00** |
| **Rupees Seven Crore Seven Lakh and Fourty Thousand only** | | |
| | **70% share of GOM** | **4,94,90,000.00** |
| | **30% share of Municipal Corporation** | **2,12,10,000.00** |

**शासन निर्णय क्रमांकः रासयो-२०११/प्र.क्र.१४८/ता.क. ३, दि. २१ मार्च २०१२ सोबतचे सहपत्र.**

**प्रपत्र - ब**

**राज्य सरोवर संवर्धन योजनेतंर्गत वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील विमल तलावाच्या कामांसाठीच्या अटी व शर्ती.**

१. लोकसहभाग व पर्यावरण जनजागृती या कार्यक्रमांविषयी प्रथमतः पर्यावरण विभागास सविस्तर कृती अहवाल सादर करण्यात यावा.

२. तलाव संवर्धन क्षेत्रात तज्ञ व कामाचा अनुभव असलेली तसेच "प्रपत्र-अ" नुसार मंजूर खर्चाच्या बाबी संबधीत तज्ञ व पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ असलेली संस्था / शासकीय प्राधिकरण / मंडळ यांची प्रथमतः **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्था** म्हणून आयुक्त, वसई-विरार महानगरपालिकेने विहीत पध्दतीने नियूक्ती करावी. ही संस्था प्रपत्र-अ नुसार मंजूर खर्चाच्या बाबींचे स्थानिक डी.एस.आर.प्रमाणे खर्चाचे अंदाज, कामाचे आराखडे तयार करणे व तपासणे कामाची गुणवत्ता राखणे, सर्व कामे विहीत कालमर्यादेत पुर्ण करणे याबाबत वेळोवेळी समन्वय करेल. महानगरपालिकेने प्रकल्पासाठी तात्रिक मनुष्यबळ तयार होण्यासाठी या संस्थेचा उपयोग करावा.

३. कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्याची व कामाची गुणवत्ता राखण्याची संपूर्ण जबाबदारी ही आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांची असेल. सदर प्रकल्पाच्या कामासाठी लागणारा निधी खर्च करताना आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांच्या देखरेखीखाली करण्यात यावा.

३. प्रकल्पाची यथायोग्य अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून **प्रकल्प सनियंत्रण समितीची** आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात यावी. या समितीत महानगरपालिकेतील संबधित अधिकारी, कर्मचारी, पर्यावरण विषयक तज्ञ, उपरोक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी यांच्यासह महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा. ही समिती प्रकल्पांतर्गत होत असलेल्या सर्व कामकाजाचे सनियंत्रण करेल व कामांच्या गुणवत्तेंवर नियंत्रण ठेवेल. सदर समितीची आढावा बैठक दर महिन्याला आयोजित करण्यात यावी.

४. प्रकल्प पूर्ण झाल्यावरही प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेच्या मदतीशिवाय तलावाचे संवर्धन होणे गरजेचे असल्याने योजनेची कामे पूर्ण झाल्यावरही ही समिती बैठका आयोजित करेल. ही समिती भौतिक बाबींची देखभाल, प्रकल्पांपासून मिळाणारे उत्पन्न, प्रकल्प संवर्धनासाठी उपाययोजना व खर्च याबाबत आढावा घेत राहील.

५. तलावाच्या पाण्याची गुणवत्ता चालू महिन्यापासून पुढे प्रत्येक महिन्याला तपासण्यात यावी. पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ प्रयोगशाळेची / संस्थेची / मंडळाची नियुक्ती करण्यात यावी. दर महिन्याचा पाण्याच्या गुणवत्तेचा अहवाल सदर संस्था प्रकल्प सनियंत्रण समितीस व पर्यावरण विभागास सादर करेल.

६. उपरोक्त मुद्दयानुसार केलेल्या कार्यवाही प्रमाणे आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका हे शासनास दर तीन महिन्याला खालील अहवाल सादर करतील

अ) मंजूर कामांचा भौतिक प्रगती अहवाल
ब) पाण्याच्या गुणवत्ता अहवालाच्या प्रती
क) प्रकल्प सनियंत्रण समितीच्या बैठकीचे इतिवृत्त
ड) खर्चाचे प्रत्येक तिमाहीचे उपयोगिता प्रमाणपत्र.

७.	सदर अहवाल सादर केल्याशिवाय कामाच्या पुढील टप्यातील निधी उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तसेच आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र वर्ष संपल्यानंतर एप्रिलच्या १० तारखेपर्यंत पर्यावरण विभागास सादर करावे. उपरोक्त मंजूर योजनेसाठी निधी उपलब्धतेनुसार अनुदान मुक्त करण्यात येईल.

८.	योजनेतंर्गत मंजूर विशिष्ट कामासाठी अदा केलेली वा मान्य केलेली रक्कम त्याच कामासाठी राज्य शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणे व विहीत कालमर्यादेत मान्य केलेल्या खर्चाच्या मर्यादेत खर्च करणे आवश्यक आहे. हा निधी इतर दुस-या कोणत्याही कामासाठी वा नगरपरिषदेच्या कामासाठी वापरता येणार नाही किंवा वळता करता येणार नाही. विशिष्ट कामासाठी मान्य केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च झाल्यास त्याची जबाबदारी संबधित आयुक्त व महानगरपालिकेची असेल.

९.	या योजनेतंर्गत प्राप्त होणारा निधी हा राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून त्या अंतर्गत जमा करावा व बँकेत ठेवलेल्या निधीवर मिळणारे व्याज याच निधीत जमा करावे. या निधीच्या उपयोगितेवर नियंत्रण राहण्यासाठी खात्याचे संचालन आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांच्याद्वारे करण्यात यावे. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करतेवेळी बँकेतील या खात्यावर झालेल्या व्यवहाराच्या नोंदी दर्शविणा-या पासबुकाची साक्षांकित प्रत सोबत जोडण्यात यावी.

१०.	योजना पूर्ण झाल्यावर या योजनेतंर्गत निर्माण झालेल्या मालमत्तेपासून किंवा सोयीसुविधांपासून मिळणारे उत्पन्न हे या योजनेसाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यातच जमा करण्यात यावे. या उत्पन्नातून तलाव संवर्धनासाठी अतिरिक्त कामे राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या अनुमतीने हाती घेता येतील. मात्र तलावाच्या संवर्धनाच्या कामाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी हा महसूली निधी वापरता येणार नाही.

११.	ही कामे शासन आदेशाच्या दिनांकापासुन २४ महीन्यात किंवा तत्पुर्वी पुर्ण करावयाची आहेत.

१२.	मंजूर बाबीतील खर्चामध्ये बचत झाल्यास बचत झालेला निधी योजनेतीलच दुस-या उपांगासाठी राज्य शासनाच्या पर्यावण विभागाच्या परवानगीने वापरता येईल.

१३.	राज्य सरोवर संवर्धन योजनेतंर्गत निर्माण केलेल्या यंत्रणेच्या देखभाल व दुरूस्तीचा खर्च योजना कार्यान्वयीत झाल्यानंतर संबंधीत महानगरपालिकेने स्वत:च्या निधीतून भागवावयाचा आहे.

१४.	योजनेतंर्गत खर्च करण्यात येणा-या रकमेचे लेखे प्रचलित लेखा संहितेनुसारच ठेवण्यात यावेत व त्याचे लेखापरिक्षण स्थानिक निधी व लेखापाल यांच्याद्वारे करण्यात यावे व त्याचा अहवाल पर्यावरण विभागास पाठविण्यात यावा.

१५.	तलावाच्या कामांच्या प्रगतीच्या अहवालाची तसेच खर्चाच्या विवरणपत्राची पर्यावरण विभागाच्या सक्षम अधिका-याकडून तपासणी करण्यात येईल व तपासणीच्या वेळी महानगरपालिकेने आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल.

१६.	संबंधीत महानगरपालिकेच्या हद्दीतील हॉटेलमधून / लोकवस्तीतून / वाणिज्यिक आस्थापनेतून निघणारे सांडपाणी तलावात जाणार नाही याची जबाबदारी संबंधीत महानगरपालिकेवर असेल.

१७.	योजनेवरील कामासाठी मान्यता प्राप्त झालेल्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च झालेली रक्कम शासनाकडून उपलब्ध होणार नाही. या कामासाठी शासनाने अदा केलेली रक्कम जर त्या कामावर घालून दिलेल्या विविक्षित वेळेमध्ये खर्च होऊ शकत नसेल तर त्यास राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल..

१८.	योजनेवरील कामासाठी अदा केलेली रक्कम योग्यरितीने वापरली जात नाही किंवा कामाची योग्य ती प्रगती होत नाही असे शासनाच्या निदर्शनास आल्यास शासन कोणत्याही क्षणी अशा कामांची प्रशासकीय मान्यता रद्दबातल करू शकेल.

१९.	राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या परवानगी शिवाय तलावात बोटींगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तसेच यांत्रिक बोटींचा वापर तलावात कुठल्याही प्रयोजनासाठी अनुज्ञेय असणार नाही. फक्त पॅडल बोटचा वापर अनुज्ञेय असेल.

२०. तलावात मत्स्यमारी शक्यतो करण्यात येवू नये. मत्स्यमारी करावयाची झाल्यास फक्त मार्च, एप्रिल व मे या तीन महिन्यासाठी परवानगी देण्यात यावी. अशावेळी १० इंच व त्यापेक्षा लहान आकाराच्या माशांना पकडण्याची मुभा देण्यात येवू नये. स्थानिक परिस्थितीनूसार याबाबत प्रकल्प सनियंत्रण समिती वेळोवेळी निर्णय घेईल.

२१. योजनेवरील कामांसाठी राज्य शासनाच्या अनुदाना व्यतिरीक्त शासनाकडून, वित्तीय संस्थाकडून वा आणखी कोणत्याही संस्थाकडून प्राप्त निधी या योजने अंतर्गत खर्च झाल्याचे दर्शविण्यात येवू नये. (No Overlaping of schems)

२२. योजनेचे समन्वयन व पर्यवेक्षण करण्यासाठी भेट देणा-या राज्य शासनाच्या अधिका-यांस आवश्यक त्या सर्व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असेल.

२३. योजनेतंर्गत शासनाच्या अनुदानातून तयार केलेली मालमत्ता, ज्या कामासाठी निर्माण केली आहे. त्याच कामासाठी वापरणे आवश्यक आहे व त्यासाठी ही मालमत्ता अभिलेखित करणे आवश्यक आहे.

२४. योजनेतंर्गत करण्यात येणा-या निरनिराळया कामांचे व समन्वयाचे काम राज्य स्तरावरील सनियंत्रण समितीव्दारे करण्यात येते. या समितीने कामाबाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असेल.

२५. योजनेतंर्गत महानगरपालिकेच्या होणा-या आस्थापनेवरील व लागणा-या मनुष्यबळावरील खर्च संबंधीत महानगरपालिकेद्वारे करण्यात येईल. यासाठी या विभागाकडून अनुदान देण्यात येणार नाही.

२६. योजनेतंर्गत तलावातून काढण्यात येणा-या गाळाचे अभिलेख व छायाचित्रासह पुरावे महानगरपालिकेने जतन करावेत. तसेच गाळाच्या विल्हेवाटीची अभिलेखामध्ये नोंद करून ठेवावी.

२७. तलाव संवर्धनाबाबत मंजूर कामांमध्ये तलावातील गाळ काढणे व सिल्ट ट्रॅप लावण्याच्या कामाचा समावेश असल्यास, तलावाच्या गाळ काढण्याच्या कामाबरोबरच तसेच पावसाळयापूर्वी सिल्ट ट्रॅप लावण्याचे काम पूर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा तलावात पुन्हा गाळ जमा होऊ शकतो.

२८. तलावाच्या कामास सुरूवात करण्यापूर्वीची छायाचित्रे विभागास सादर करावीत.

२९. राज्य शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटींचे व शर्तींचे पालन करणे महानगरपालिकेवर बंधनकारक राहील.

३०. योजनेतंर्गत किती लोकांना रोजगार उपलब्ध झाला याची नोंद ठेवावी.

३१. योजना कालमर्यादेत पूर्ण करणे बंधनकारक असल्याने योजने करीता कोणतेही एस्कलेशन चार्जेस अनुज्ञेय नाहीत.

३२. योजनेतर्गत मंजूर कामांच्या निविदा हया प्रकल्पातंर्गत मंजूर किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या स्विकारण्यात येऊ नयेत.

३३. कॉन्ट्रॅक्टरने विहीत वेळेत काम पूर्ण न केल्यास त्यांच्यावर दंडाची तरतूद ठेवण्यात यावी.

३४. योजनेतंर्गत झालेल्या सर्व खर्चाचा ताळमेळ वेळोवेळी अधिदान व लेखाअधिकारी कार्यालय, मुंबई व तसेच महालेखाकार कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयाशी घालण्याची जबाबदारी संबधीत महानगरपालिकेची असेल.

३५. योजना पुर्ण झाल्यावर भविष्यात तलावाच्या उपयोगाबाबत व वापराबाबत किंवा तलावासंदर्भात कोणतीही नविन कामे हाती घ्यावयाची झाल्यास त्यास प्रथम राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाची मान्यता घेण्यात यावी.